# विदर्भ कोकण ग्रामीण बँक

# VIDHARBHA KONKAN GRAMIN BANK

भारत सरकार, बँक ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

Govt. of India, Bank of India & Govt. of Maharashtra Undertaking

Regional Office Akola


## बँकेच्या खालील शाखा कार्यालयासाठी इमारत भाड्याने घेण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

विदर्भ कोकण ग्रामीण बँकेला प्रस्तावित खालील शाखांसाठी / कार्यालयासाठी इमारतीची आवश्यकता आहे. इमारत तळमजल्यावर, पुरेशी पार्किंग सुविधा, V-Sat सयंत्र बसविण्यासाठी जागा पाणी व स्वच्छता गृहाची सोय व सर्व सोयीनी युक्त असावी. इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असावे. इमारत / जागेसंबंधात कुठल्याही प्रकारचा वाद नसावा. फक्त जागा मालकांनीच प्रस्ताव पाठवावे. **प्रस्तावित शाखेचे ठिकाण पत्ता व अपेक्षित चटई क्षेत्र खालील प्रमाणे,**

| प्रस्तावित शाखेचे ठिकाण | तहसील / जिल्हा | अपेक्षित चटई क्षेत्र (Sq. Ft) | अर्ज पाठवावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| मेहकर | मेहकर | १००० – १५०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| देऊळगाव राजा | देऊळगाव राजा | १००० – १५०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| सिंद्खेड राजा | सिंद्खेड राजा | १००० – १५०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| वरवट बकाल | संग्रामपुर | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| अंढेरा | देऊळगाव राजा | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| नरवेल | मलकापुर (बुल) | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| पहुरजिरा | शेगाव | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| गणेशपूर | खामगाव | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| शेलगाव बाजार | मोताला | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| आपतापा | अकोला | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| म्हैसांग | अकोला | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| उरळ | बाळापुर | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| अंदुरा | बाळापुर | ८०० – १२०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |
| मलकापुर (अकोला) | अकोला | १००० – १५०० | क्षेत्रीय कार्यालय अकोला |

इच्छुक इमारत मालकांनी दिलेल्या मुदतीत विहित नमुन्यात बँकेला प्रस्ताव सादर करावेत. इमारतीच्या प्रस्तावासोबत जागेच्या मालकीबाबतची कागदपत्रे व जागेचा/इमारतीचा मंजूर / प्रमाणित नकाशा, भाड्याने घ्यावयाच्या जागेचा लेआऊट प्लान, इमारतीचा व आंतरिक भागाचे फोटोग्राफ्स जोडावे. शासकीय व निमशासकीय संस्थाच्या इमारतीचा प्रस्तावही स्वीकारला जाईल .
अर्जाचा नमुना संबंधित शाखेतून / क्षेत्रीय कार्यालयातून प्राप्त करावा.ठळक अटी पुढीलप्रमाणे :

१ घरमालक जागा भाडे तत्वावर ( Lease ) देण्यास तयार असावा.
२ . भाडेपट्टाकरार कमीत कमी १० वर्षा करिता राहील.
३ भाडेपट्टा करार नोंदणीकृत करावा लागेल व त्याचा खर्च घरमालकास करावा लागेल.
४ जागेत पाण्याची, स्वच्छता गृहाची व शाखेच्या इमारतीवर V-Sat सयंत्र बसविण्यास सुविधा उपलब्ध असावी. इतर अटी लागू राहतील.

सीलबंद प्रस्ताव क्षेत्रीय प्रबंधक, विदर्भ कोकण ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय,"मधुमालती बिल्डींग,गुप्ते मार्ग, जठारपेठ, अकोला येथे ०७/१०/२०१७ पर्यंत पोहचेल अशा पद्धतीने पाठवावे.पाकिटावर विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखासाठी " भाडेतत्वावर इमारत देणेसाठी प्रस्ताव" असा उल्लेख करावा.प्रस्ताव दाखल करावयाच्या अंतिम तारखेस सुट्टीचा दिवस असल्यास किंवा सुट्टी जाहीर झाल्यास प्रस्ताव पुढील कामकाजाच्या दिवशी स्वीकारण्यात येईल. दिनांक ०७/१०/२०१७ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.कुठलेही कारण न कळविता प्रस्ताव मंजूर / नामंजूर करण्याचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

(रमेश रा. [illegible])
क्षेत्रीय प्रबंधक, अकोला क्षेत्र


Regional Office:-"Madhumalati Building"1st Floor,Gupte Marg, Jatharpeth, Akola.PIN:444005
Phone No:- (0724-2491766,2490100, Fax No:- 07240-2490533,Email:- vkgb.robul@gmail.com

मा. ------------------

विदर्भ कोकण ग्रामिण बँक,

---------------- कार्यालय,

.................

विषय: भाडेतत्वावर बँकेच्या------------------ शाखेसाठी स्वमालकीची

<u>इमारत भाड्याने देण्यासाठी प्रस्ताव.</u>

महोदय

मला / आम्हास असे ज्ञात झाले की, आपले बँकेच्या नियोजित स्वावलंबी शा........................ शाखेकरीता इमारतीची माझे / आमचे मालकीची इमारत असुन ही इमारत आवश्यकता आहे. भाडेतत्वावर देण्यास तयार आहे. ही इमारत कायदेशीर दृष्ट्या पूर्णपणे माझे / आमचे मालकीची असून ह्या इमारतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे आहे.

1. इमारतीचा वर्तमान पत्ता :

   ....................................................................................................

   ....................................................................................

   ....................................................................................................

2. इमारत मालकाचे नाव,.................................................................................

   पत्ता,.............................................................................................

   फोन व मोबाइल नंबर

   ....................................................................................................

3. भुखंडाचे क्षेत्रफळ, : ______________ चौ. फूट

   बांधकाम क्षेत्रफळ व ______________ चौ. फूट

   माळा..............................................................................................

   पैकी आपणास भाड्याने देण्याच्या जागेचे चटई क्षेत्र ......... ... चौ. फूट आहे. ते आम्ही प्रत्यक्ष मोजलेले आहे.

4. पार्किंगकरीता उपलब्ध जागा : आहे / नाही

5. बांधकामाचा प्रकार व बांधकाम वर्ष : .................................................................

6. मासिक भाडे : रू. ............ प्रती स्क्वेअर फुटप्रमाणे रू. ...................... प्रतिमाह

   अक्षरी रू. ...............................................................

   इमारतीच्या स्लॅबवर व्हीसॅट सयंत्र बसविण्यास माझी संम्मती आहे. तसेच शाखेसमोर माझी/ आमची उपलब्ध जागा पार्किंग म्हणून वापरण्यास माझी/आमची संम्मती आहे.

7. कर : शाखेच्या जागेसाठीचा कोणत्याही प्रकारचा स्थानिक कर (नगर परिषद/ग्रामपंचायत कर) हा आम्ही देण्यास तयार आहोत.

8. पट्टा / लिज : इमारतीचा कब्जा घेतल्यापासून वर्षाकरीता करार/पट्टा (लिज) राहील. प्रत्येक पाच वर्षानंतर इमारतीच्या मासिक भाड्यात % भाडे वाढ करावी लागेल. बँक तिन महिन्यापूर्वी आगावू सूचना देवून किंवा तिन महिन्याचे भाडे देवून इमारत सोडू शकेल.

9. कायदे : Lease Deed (पट्टा) करण्यासंबंधीचा खर्च स्टॅम्प शुल्क / पंजीयन शुल्क, इतर कायदेविषयक विषयक खर्च बँक व मी/आम्ही अर्धा/अर्धा (५०% : ५०%) करण्यास तयार आहोत.

10. विद्युत खर्च : वापरण्यात आलेल्या विजेच्या वापराचा खर्च बँक स्वत: करेल. परंतु मी/आम्ही शाखेकरीता वेगळे वाणीज्य सब मिटर किंवा वाणीज्य मिटर बसवून द्यावयास तयार आहोत.(शाखेच्या आवश्यकतेनुसार ट्युबलाईट, पंखे, बल्ब, कुलर करीता आवश्यक त्या ठिकाणी विद्युत पॉईंट आम्ही लावून देवूत.)

11. पाण्याची व्यवस्था : शाखेच्या/कार्यालयाच्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था मी/आम्ही स्वत: करून देवू. भविष्यात नळ इ. उपलब्ध झाल्यास त्याचा खर्च मी/आम्ही स्वत: करू.

12. स्वच्छता गृहाची व्यवस्था : या इमारतीमधे आम्ही बँकेसाठी स्वतंत्र अशी शौचालय व्यवस्था व बाथरूमची व्यवस्था आपणास देत आहोत. या जागेच्या चटई क्षेत्राचा समावेश वरील परिच्छेद क्र. ४ मधे आहे.

13. अंतर्गत बदल: बँकेच्या आवश्यकतेनुसार विचार विमर्श करून आवश्यक ते बदल/परिवर्तन/परिवर्धन करुन देण्यास मी/आम्ही तयार आहोत.

14. सुरक्षा व्यवस्था करीता : बँकेच्या आवश्यकतेनुसार मुख्य दारास तसेच तिजोरी खोलीला शटर व ग्रील गेट, मजबुत दरवाजा,खिडकीस ३'x ३' /बचाव उपाय च्या १० मिमी च्या जाळया इत्यादी बाबीं मी/आम्ही स्वत: खर्च करून लावून देवू.

15. रंगरंगोटी : बँकेस इमारत भाडे कराराने देण्यापुर्वी सर्व भिंती, दरवाजे/खिडक्यांना बँकेने सांगितल्यानुसार रंगरंगोटी करून देण्यात येईल. यानंतर दर तिन वर्षातून एकदा इमारतीस रंगरंगोटी करून देवू.

16. कर्जाची आवश्यकता : या करीता मला/आम्हास रू..................... कर्जाची आवश्यकता आहे. बँकेनी रू. ............... कर्जाच्या आमच्या विनंतीस बँकेच्या नियमानुसार स्विकृत करावे. ह्या कर्जाची व व्याजाची परतफेड भाडे रकमेतून करून दिल्या जाईल.

मी/आम्ही उपरोक्त शर्तीचे आधारावर माझी/आमची इमारत आपले बँकेच्या नियोजीत शाखेस देण्यासंबंधाने सहमती पत्र लिहुन देत आहो/आहोत. सोबत जागेचा नकाशा, ग्राम पंचायत/नगर परीषद कर पावती, व खाते उतारा जोडलेला आहे. ह्या व्यतिरीक्त लागणारी सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास तयार आहोत. ह्या इमारतसंबंधाने कुठलाही वाद/विवाद नाही.

कृपया आपली सहमती त्वरीत कळवावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्थान : ..................................

दिनंक ..................................

(.......................................................)

पूर्ण नाव : ______________________________